# मिरा भाईंदर महानगरपालिका

**स्व इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग,**
**भाईंदर (प.), ता.जि. ठाणे, 401 101.**
**दुरध्वनी क्र. 28192828/28193087.**

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**जा.क्र.मनपा/आस्था/2880/2024-25** **दि.20/01/2025**

**परिपत्रक**

विषय :- कर्मचारी भरपाई कायदा, 1923 अंतर्गत ठेका कर्मचाऱ्यांचे मेडिक्लेम विमा काढणेबाबत...

कामगारांची सामाजिक सुरक्षा लक्षात घेऊन "कर्मचारी भरपाई कायदा, 1923" लागू करण्यात आला आहे. कर्तव्यावर असताना आणि कामावर असताना कामगाराला दुखापत, अपंगत्व किंवा मृत्यू झाल्यास मालकाकडून कामगारांच्या कुटुंबीयांना भरपाई देण्याची तरतूद आहे.

"कर्मचारी राज्य विमा निगम अधिनियम 1948" नुसार, ज्या कर्मचाऱ्यांचे वेतन रु.21,000/- व त्यापेक्षा कमी आहे, असे कर्मचारी "कर्मचारी राज्य विमा" लाभाकरीता पात्र ठरतात. परंतु मिरा भाईंदर महानगरपालिकेमध्ये कार्यरत कंत्राटी कर्मचाऱ्यांपैकी बहुतांश कर्मचाऱ्यांचे वेतन प्रती महिना रु.21,000/- पेक्षा जास्त आहे. त्यामुळे असे कर्मचारी "कर्मचारी भरपाई कायदा 1923" अंतर्गत पात्र होत आहेत, अशा सर्व कामगारांना "कर्मचारी भरपाई अधिनियम 1923" चा लाभ मिळणेसाठी कंत्राटदारांकडून खालीलप्रमाणे कार्यवाही करुन घ्यावी.

**"कर्मचारी भरपाई अधिनियम 1923 लागु असलेल्या कर्मचाऱ्यांबाबत कंत्राटदाराने करावयाची कार्यवाही :**

1) संबंधित कंत्राटदारामार्फत कार्यरत सर्व कंत्राटी कर्मचाऱ्यांना "कर्मचारी भरपाई अधिनियम 1923" अंतर्गत सभासद करुन घ्यावे.
2) कंत्राटदाराने कामगार भरपाई विमापत्रामध्ये किमान वेतन दर नमूद करावे.
3) "कर्मचारी भरपाई अधिनियम 1923" नुसार कंत्राटदाराने सर्व कंत्राटी कामगारांचा विमा काढावा.
4) कंत्राटदाराने काढलेल्या कंत्राटी कामगारांच्या विम्यामध्ये कामगारांसाठी अपंगत्व, अपघाती मृत्यू इ. सर्व दाव्यांचा समावेश करावा.
5) कर्मचारी भरपाई अधिनियम 1923 लागू असलेल्या कंत्राटी कर्मचारी यांना मेडिक्लेम सुविधा उपलब्ध करुन द्यावी.
6) कर्मचारी भरपाई अधिनियम 1923 लागू झालेले कंत्राटी कर्मचारी राहत असलेल्या ठिकाणाजवळचे व महानगरपालिका कार्यक्षेत्रातील जास्तीत जास्त रुग्णालये मेडिक्लेम कॅशलेस पॉलिसी रेकॉर्डमध्ये नमूद करावे.
7) मेडिक्लेम पॉलिसीचे नुतनीकरण प्रती वर्षी करावे.

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या विविध विभागामध्ये कार्यरत कंत्राटदार यांच्या अधिनस्त असलेल्या कंत्राटी कामगारांना "कर्मचारी भरपाई कायदा 1923" अंतर्गत विमा काढणेबाबत कंत्राटदाराकडून उपरोक्तप्रमाणे कार्यवाही करुन घेण्यात यावी.

(कल्पिता पिंपळे)
उप-आयुक्त (मुख्यालय)
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रति,
सर्व विभाग प्रमुख/खाते प्रमुख
मिरा भाईंदर महानगरपालिका

/- सर्व विभागप्रमुख/खातेप्रमुख यांनी आपल्या अधिनस्त असलेल्या कंत्राटदार यांना सदर परिपत्रकाच्या अनुषंगाने कार्यवाही करणेबाबतचे निर्देश देण्यात यावे.